**मे. मोहटादेवी शूगर मिल्स अँड अग्रो लिमिटेड, गट नं. ६१२, गाव मातोरी, ता. शिरूर कासार, जि. बीड या प्रस्तावित नविन प्रकल्प ज्यामध्ये १५० केएलपीडी साखरेचा पाक/मळी आधारीत आसवणी प्रकल्पाचे उत्पादन करणे बाबत दिनांक १९/०९/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. मोहटादेवी शूगर मिल्स अँड अग्रो लिमिटेड, गट नं. ६१२, गाव मातोरी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. मोहटादेवी शूगर मिल्स अँड अग्रो लिमिटेड, गट नं. ६१२, गाव मातोरी, ता. शिरूर कासार, जि. बीड या प्रस्तावित नविन प्रकल्प ज्यामध्ये १५० केएलपीडी साखरेचा पाक/मळी आधारीत आसवणी प्रकल्पाचे उत्पादन करणे बाबत दिनांक १९/०९/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. मोहटादेवी शूगर मिल्स अँड अग्रो लिमिटेड, गट नं. ६१२, गाव मातोरी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६१/ २०२२ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २२०९०७- एफटीएस-००७२ दि. ०७/०९/२०२२ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. संतोष राऊत,**<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, बीड. | : | अध्यक्ष |
| २. | **श्री. दिलीप खेडकर,**<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद. | : | सदस्य |
| ३. | **श्री. सो. म. कुरमूडे,**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. मोहटादेवी शूगर मिल्स अँड अग्रो लिमिटेड, गट नं. ६१२, गाव मातोरी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांच्या प्रस्तावित नविन प्रकल्प ज्यामध्ये १५० केएलपीडी साखरेचा पाक/मळी आधारीत आसवणी प्रकल्पाचे उत्पादन

कर१णे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. मोहटादेवी शूगर मिल्स अँड अग्रो लिमिटेड यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. २२/०७/२०२२ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. १९/०९/२०२२ वेळ-सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. १९/०८/२०२२ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
२. जिल्हा परिषद, बीड.
३. जिल्हा उद्योग केंद्र, बीड.
४. तहसिल कार्यालय, शिरूर कासार, जि. बीड.
५. ग्रामपंचायत कार्यालय, मातोरी, मालेगाव, मिदसांगवी, बरजवाडी, धारवाडी, तिंतरवणी, भाळकेश्वर, श्रीपतवाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड.
६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे कूठल्याही प्रकारची सूचना, लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी प्राप्त झालेली नाही. तरी उपस्थित नागरिकांमधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

त्यानंतर श्री. दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे आजूबाजूच्या गावातील उपस्थित सर्व नागरिकांचे स्वागत केले. तसेच पूढे त्यांनी, डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी यांनी अगोदर सांगितल्याप्रमाणे प्रकल्पाविषयी थोडक्यात माहिती विषद केली. तसेच सदर प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण

प्रकल्प प्रवर्तक करतील व तदनंतर त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, व्यवस्थित सादरीकरण ऐकावे व त्यानंतर आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण अगोदर आपले नाव व गावाचे नाव सांगून प्रश्न विचारावेत. त्यानंतर डॉ. योगिनी बाळंखे यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

डॉ. हेमांगी नलावडे, प्रकल्प सल्लागार, मे. मिटकॉन कंन्सलटंन्सी व इंजिनिअरींग सर्विसेस लि., पूणे यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी प्रकल्प धारकाचे अभिनंदन केले व सांगितले की, अत्यंत चांगल्या प्रकारचा प्रकल्प आपण राबवित आहात. कारण असे प्रकल्प ग्रामीण भागामध्ये येणे अत्यंत आवश्यक आहे यामूळे ग्रामीन भागातील नागरिकांना रोजगार मिळेल जेणेकरून ग्रामीण भागातील नागरिकांचा व गावाचा विकास होण्यासाठी उपयूक्त ठरेल. त्यानंतर त्यांनी उपस्थित नागरिकांना विचारले की, सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण आपणास व्यवस्थित समजले आहे का नाही किंवा समजले नसेल तर आपणास जे समजले नाही त्याचे पून्हा सादरीकरण करण्यात येईल, परंतू उपस्थित नागरिकांमधून कोनीही पून्हा सादरीकरणाची मागणी न केल्याने प्रस्तावित प्रकल्पाबाबत सूचना, आक्षेप, हरकत असल्यास त्यांनी उपस्थितांना सूचविण्याचे आव्हान केले. त्यानंतर त्यांनी प्रकल्प आराखडा विषयीची स्लाईड दर्शविण्यास सांगितले तसेच ईआयए ड्राफट मध्ये ज्या काही चूका झालेल्या आहेत त्यात सूधारणा करावी असे सूचविले. त्यानंतर त्यांनी सांगितले की, सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील ते केवळ पर्यावरण विषयक विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्पा व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तार/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्रं. | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|
| १. | श्री. दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद यांनी खालील प्रमाणे प्रश्न उपस्थित केले-<br>१. सादर केलेला ईआयए ड्राफटमध्ये १० कि.मी. च्या परिघक्षेत्रामध्ये मॉनिटरींग करणे आवश्यक आहे. त्यामध्ये मुख्यता: कूठल्या विहीरीच्या पाण्याचे नमुने घेण्यात आले आहे, त्या विहीरी मालकाचे व गावाचे नाव तसेच कोणत्या गावामध्ये हवेची गुणवत्ता तपासण्यात आली आहे याबाबत प्रकल्प सल्लागारानी माहिती दयावी, तसेच त्यांनी माझे गाव येथून ४ कि.मी. अंतरावर आहे. परंतु त्या ठिकाणी मॉनिटरींग केले नसल्याचे दिसून येते. असे का ?<br>२. प्रकल्पाच्या नकाशा (Layout Plan) मध्ये वृक्षारोपणासाठीच्या जागेची मापे/क्षेत्रफळ दाखवण्यात आलेले नाही. नियमानूसार एकूण जागेच्या कमीत कमी ३३% क्षेत्रावर वृक्षारोपण करणे आवश्यक असताना तसे दाखवत नाही , याचे स्पष्टीकरण काय आहे.<br>३ केंद्रशासनाने दिलेल्या परवानगीमध्ये नमूद केलेल्या वृक्षारोपणत काही तफावत आढळल्यास कारखाण्याविरूध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे कार्यवाही करण्यात येते हे लक्षात ठेवावे. ईआयए रिपोर्ट हा बेसलाईन स्टडी असते जेणेकरूण भविष्यात प्रदूषणाविषयी काही तक्रारी प्राप्त झाल्या तर त्या सोडवणे सोपे जाईल. या कारणामूळे प्रकल्प सलागारांनी ज्या काही सूधारणा करायच्या असतील त्या करण्यात याव्या. | यावर डॉ. हेमांगी नलावडे, प्रकल्प सल्लागार, यांनी उत्तर दिले की, सदरच्या ईआयए ड्राफट मध्ये मा. प्रादेशिक अधिकारी यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सर्व सूचनांचा समावेश करण्यात येईल तसेच प्रकल्पाच्या नकाशामध्ये केंद्र शासनाने नमूद केल्या प्रमाणे जागा ही वृक्षारोपणासाठी राखीव ठेवण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री. विठठल वैजनाथ खेडकर, रा. घो. पारगाव, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी सदरच्या प्रकल्पास सहमती दर्शवून. त्यांनी पूढे सांगितले की, हा कारखाना सूरू होणे फार आवश्यक आहे कारण शिरूर तालूक्यात आजूबाजूच्या गावामध्ये भरपूर पाणी आहे तसेच उस पिक भरपूर प्रामाणात घेण्यात येते परंतू सदरचा उस देण्यासाठी भरपूर लांब जावे लागते ही फार गंभीर परिस्थीती इथल्या शेतक-याची आहे. त्यामूळे हा प्रकल्प उभा राहीला तर शेतक-यांचा नक्कीच येथे फायदा होईल. त्यांनी पूढे प्रशासनास विनंती केली की, सदरचा प्रकल्पामूळे गावातील नागरिकांना येथे रोजगार निर्मिती होईल, शेतक-यांचा फायदा होईल व गावाचा विकास होण्यास मदत मिळेल तसेच या प्रकल्पासाठी येथील शेतक-यांचा आपणास पाठींबा राहील असेही मत त्यांनी मांडले. | ------ |
| ३. | श्री. विष्णू भाउसाहेब नितळ, सरपंच ब्रम्हनाथ येळंब ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी सदरच्या सहमती दर्शवून त्यांनी पूढे सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रातील उस उत्पन्न असलेल्या भागात उस तोडणी साठी या भागातील/पंचकृषीतील नागरिक सदर उस तोडणीसाठी सहकूंटूब लांब लांब जातात. त्यामूळे हा प्रकल्प जर येथे झाला तर या नागरिकांचे स्थलांतर थांबेल व त्या नागरिकांचा येथे फायदा होईल त्यांना लांब बाहेर उस तोडणीसाठी जावे लागणार नाही. तसेच येथील शेतकरी हा प्रकल्प झाल्यावर उस उत्पादन मोठया प्रमाणात घेतील व शेतक-यांना बळ मिळेल व परिसरातील नागरिकांना येथे रोजगार मिळेल. त्यांनी विनंती केली की, हा प्रकल्प झाला पाहिजे या प्रकल्पासोबत आम्ही सर्व शेतकरी आहोत असे त्यांनी सांगितले. | ------ |
| ४. | श्री. आत्माराम सूपेकर, ब्रम्हनाथ येळंब, यांनी आनंदाने सांगितले की, श्री. दिलीप खेडकर साहेब हे या भागातील विकासधूत आहेत तसेच | यावर डॉ. हेमांगी नलावडे, प्रकल्प सल्लागार, यांनी उत्तर दिले की, सदर सिंदफना नदी ही हवेच्या १० कि.मी. च्या अंतरावर येत नसेल किंवा शासनाच्या |

| | | |
|---|---|---|
| | या भागामध्ये विकास होण्यासाठी चांगला प्रकल्प उभारण्यात यावा अशी त्यांची नेहमीच धारणा आहे व ते यासाठी नेहमीच जागरूक असतात. तसेच त्यांनी कारखान्याचे प्रतिनिधी यांना विनंती केली की, कारखाना व्यवस्थित चालवण्यासाठी आपण नविन नविन तंत्रज्ञानाचा यामध्ये समावेश करावा जेणेकरून शेतक-यांना दुर्गंध किंवा इतर त्रास होवू नये असे प्रयत्न करावे. तसेच मे. मिटकॉन कंन्सलटंन्सी व इंजिनिअरींग सर्विसेस लि., यांचे प्रकल्प सल्लागार यांना त्यांनी विचारले की, आपण सादरीकरणातील आराखडयामध्ये सांगितल्या प्रमाणे सर्व नदयांचे नाव आहेत परंतू गोदावरीची प्रमूख उपनदी असलेली सिंधपना या नदीचा उल्लेख नाही असा प्रश्न उपस्थित केला. तसेच त्यांनी प्रकल्पाचे प्रतिनीधी यांना पूढिल वाटचाली साठी शूभेच्छा दिल्या व श्री. खेडकर साहेब यांनी प्रकल्पाला योग्य असे तज्ञ मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. | गूगल सर्वे मॅपनूसार तपासून आपणास कळविले जाईल असे सांगितले.<br><br>यावर श्री. दिलीप खेडकर यांनी सांगितले की, सदरचा ईआयए (मसूदा) ड्राफट हा कच्च्या स्वरूपाचा असतो. जर ती नदी १० कि.मी. च्या आत असेल तर ईआयए (मसूदा) ड्राफटमध्ये नव्याने सूधारणा कराव्यात असे त्यांनी प्रकल्प सल्लागारास सुचित केले. |
| ५. | श्री. ज्ञानदेव नागरगोजे, सरपंच, माळेगाव, यांनी सांगितले की, सदर प्रकल्पासून त्यांचे शेत हे ५०० मीटरच्या अंतरावर आहे. सदर सादरीकरणामध्ये सांगितल्यप्रमाणे, कारखान्यामूळे आजूबाजूच्या शेतातील नूकसान होणार नाही, पाण्याची विल्हेवाट कशी लावणार, तसेच येथील स्थानिक लोकांना रोजगार दिला जाईल, असे आपण कारखाना सूरू होण्या अगोदर सांगताय, परंतु या सर्व गोष्टीची आम्हाला शास्वती नाही. | यावर डॉ. हेमांगी नलावडे, प्रकल्प सल्लागार, यांनी यावर थोडक्यात सांगितले की, कारखाना सूरू करण्यासाठी नियम व अटी लागू केल्या जातात जर कारखान्यांने नियमांचे काटेकोरपणे पालन केले नाही तर त्यांना कारखाना बंद करण्याची वेळ येवू शकते. प्रभाव मूल्यांकन अहवाल (EIA) तसेच भारतीय सरकारच्या नियमानूसार पर्यावरणाची अधिसूचनेनूसार बांधकाम/परीचलन टप्पयामधे पर्यावरणाची हानी होवू नये यासाठी नियमानूसार वेळोवेळी परिक्षण करण्यात येते. तीन महिने किंवा सहा महिण्याला अधिकृत असलेल्या संस्था यांच्या कडूनही निरीक्षणे/ तपासणी करण्यात येतील. तसेच चिमणीमधून बाहेर पडणारा धूरासाठी नियमानूसार ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टीम बसवली जाते (OCEMS) व ती सिस्टीम सीपीसीबी व एमपीसीबी च्या सर्वरशी जोडली जाते जेणेकरून निघणा-या धूराची किती मर्यादा आहे हे वेळोवेळी तपासली जाते व त्याची नोंद घेतली जाते. तसेच मप्रनि मंडळाचे अधिकारी कारखान्याला वेळोवेळी भेट देत |

| | | |
|---|---|---|
| | | असतात. यामूळे निर्माण होणा-या प्रदूषणाच्या समस्या कमी होतील यात शंका नाही.<br><br>यावर श्री. दिलीप खेडकर यांनी सांगितले की, आपण अत्यंत चांगला पर्यावरण विषयक प्रश्न विचारला. पूर्वीच्या अनूभवानूसार साखर कारखान्यातून दूर्गंध येणार, प्रदूषण होणार असे होते परंतू आता नविन तंत्रज्ञानाचा वापर सूरू झालेला आहे. कारखाना हा Zero Liquid Discharge (ZLD) वर आधारीत आहे म्हणजे निर्माण होणारे सांडपाणी आजूबाजूच्या परिसरात जाणार नाही. तसेच सांडपाण्याची वाफ तयार करून उरलेला जो घनकचरा आहे तो सदर अधिकृत कारखान्याला विल्हेवाटीसाठी पाठवला जातो. हवेच्या प्रदूषणावर त्यांनी सांगितले की, पोल्यूशन कंट्रोल सिस्टिममध्ये नविन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो ज्यामध्ये ESP सिस्टिम बसविण्यात येईल ज्यामधून धूळीचे कनही दिसणार नाहीत. तसेच ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टीम बसवली जाते (OCEMS) व ती सिस्टीम सीपीसीबी व एमपीसीबी च्या सर्वरशी जोडली जाते. आणि त्यांचे मानांकन जर अधिक आढळल्यास कारखान्यांकडून बँक गॅरंटी घेतली जाते व नियमांचे पालन नाही झाल्यास मंडळाकडून कायदेशीर कार्यवाही करून बँक गॅरंटी जप्त करण्यात येते. त्यामूळे कारखान्याला नियमांचे पालन करावेच लागते. |
| ६. | श्री. अभिमान अण्णासाहेब जरांगे, सरपंच, मातोरी ग्रामपंचायत, यांनी, सदर कारखान्यांमध्ये येथील स्थानिक नागरिकांना जास्तीत जास्त रोजगार देण्यात यावा अशी प्रशासनास विनंती केली. | यावर श्री. दिलीप खेडकर यांनी सांगितले की, प्रकल्पाचे प्रतिनीधी हे आजूबाजच्या गावातीलच नागरीकांनांच रोजगारासाठी प्राधाण्य देतात व कायदयातील नियमानूसार त्यांना आजूबाजचे नागरिकच रोजगारासाठी घ्यावे लागतात. |
| ७. | श्री. बाबूराव जयवंत सानप, घा. पारगाव, यांनी सांगितले की, या भागामध्ये जवळपास ६ ते ७ लाख उस उत्पादन आहे परंतू या भागात उस कारखाना नसल्यामूळे बाहेर दूस-या भागात उस न्यावा लागतो व भाव पण मिळत नाही त्यामूळे शेतक-यांचा तोटा होतो. त्यामूळे हा कारखाना होणे फार गरजेचे आहे. | ----- |

| | | |
|---|---|---|
| ८. | श्री. जय खेडकर, सरपंच, तिंतरवणी, यांनी सांगितले की, प्रदूषाबाबत बोलायचे झाले तर श्री. दिलीप खेडकर साहेब याच भागातील प्रमूख आहेत त्यामूळे येथील शेतक-यांचे नूकसान होणार नाही व येथील नागरिकांना त्याचा फायदा होईल असेच ते बघतील व सदर कारखाना लवकरात लवकर सूरू करावा अशी सदर समितीस विनंती देखील त्यांनी केली. | ----- |
| ९. | श्री. राजेंद्र पांडूरंग खेडकर, घा. पारगाव, यांनी सांगितले की, सदर प्रकल्प हा येथील शेतक-यांसाठी वरदान आहे त्यामूळे हा प्रकल्प सूरु झाला पाहीजे अशी विनंती केली. | ----- |
| १०. | श्री. ज्ञानदेव नागरगोजे, सरपंच, माळेगाव(चकला), ता. शिरूर का., जि. बीड यांनी प्रकल्पाविषयी लेखी स्वरूपात अर्ज सादर केलेला आहे अर्जामध्ये खालील मूद्यांचा समावेश करण्यात आलेला आहे-<br>१. वर्तमानपत्रातील नोटीसमध्ये नमुद केलेल्या मे. मोहटा देवी शूगर मिल्स लिमिटेड, मातोरी या कारखान्यास दिं. १४/०९/२००६ रोजी परवानगी दिल्याचे दिसून येत आहे. याचाच अर्थ १७ वर्षापूर्वी यास मंजूरी दिल्याचे दिसून येते.<br>२. मौजे माळेगांव (चकला) येथून सुमन सहकारी कारखाना हा १२ कि.मी. अंतरावर आहे व मोहटा देवी शूगर मिल्सा प्रा.लि. मातोरी ही शूगर मिल्स दोन कि.मी. अंतरावर आहे. या दोन कारखान्यामध्ये जेमतेम १४ कि.मी. अंतर आहे. व नियमानूसार दोन साखर कारखान्या मधील अंतर हे २५ कि.मी. पेक्षा कमी असू नये. दोन्ही साखर कारखाने झाल्यास होणारे प्रदूषण असहय होणार असल्याचे व त्याचा परिणाम मानवी जिवनावर, शेती, | श्री. सो. म. कुरमूडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत नोंद घेण्यात आलेली असल्याचे सांगितले तसेच प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना याबाबत स्पष्टीकरण सादर करण्याचे सूचविले. |

| | | |
|---|---|---|
| | पशुधन चारा यांचा –हास करणारे असल्याने हे अंतर आपल्या स्तरावर तपासून पहावे व याची खातर जमा करावी.<br>३. मे. मोहटा देवी शूगर मिल्स लि. मातोरी यास प्रात्प झालेला IEM मधील नियमानूसार मे. मोहटा देवी शूगर मिल्स लि. कारखान्याच्या प्रवर्तकांनी बँक गॅरंटीची पूर्तता केलेला आहे का.<br>४. Sugar Cane (Control) order- 1966 च्या कलम ६ च्या तरतूदीनूसार कारखान्याचे हवाई अंतर हे नियमात बसते का व बसत नसेल तर असा परवाना देणे नियबाहय होईल व दोन्ही साखर कारखान्याच्या प्रदूषणाने मानवी जीवनावर, शेती व पशूधन यासह पर्यावरणाची मोठी हानी होईल व प्रदूषण कायद्याने हे गैर असेल. | |
| ११. | श्रीमती छबुबाई ज्ञानोबा राख, सरपंच, बोरगाव (चकला), ता. शिरूर का., जि. बीड यांनी प्रकल्पाविषयी लेखी स्वरूपात अर्ज सादर केलेला आहे अर्जामध्ये खालील मूद्यांचा समावेश करण्यात आलेला आहे-<br>१. मे. मोहटा देवी शूगर मिल्स लि. हा कारखाना मौजे मातोरी , ता. शिरूर का. जि. बीड येथे प्रस्तावित असून सदर कारखान्या पासून माझे गाव २.५ कि.मी. अंतरावर आहे. असे असतांना नोटीस मध्ये आमचे गाव अथवा आपल्या कार्यालयाकडून माझ्या गावाला नोटीस देण्यात आलेली नाही व गावाचे नाव हे वर्तमान पत्रातील नोटीसमध्ये नमूद नाही.<br>२. मे. मोहटा देवी शूगर मिल्स लि. हा कारखाना मान्यता मिळाली तरी तेथे निघणा-या मळीचे विर्सजन हे किन्हा नदी व ओढयाद्वारे येणार असल्याचे दिसते. | श्री. सो. म. कुरमूडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत नोंद घेण्यात आलेली असल्याचे सांगितले तसेच प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना याबाबत स्पष्टीकरण सादर करण्याचे सूचविले. |

| | | |
|---|---|---|
| | ३. मळीचे विसर्जन करणेमूळे गावातील पिण्याचे व शेतीच्या पाण्याचे मोठया प्रमाणावर प्रदूषण होण्याची श्यकता आहे.<br>४. तसेच किन्हा नदीवर मोठया प्रमाणावार मच्छीमार व्यवसाय असल्याने व त्यावर उपजिविका करणा-याचे जिवन जगणे मूशकील होईल.<br>५. तसेच मळी पाण्यात मिळाल्याने व ते पाणी शेतात गेल्यास मोठया प्रमाणावर शेतीतील मातीची गुणवत्ता खराब येईल व शेती पिकणार नाही. | |
| १२. | श्री. बबनराव एकनाथराव गर्कळ, मा. सरपंच, घोगस पारगाव, ता. शिरूर कासार, जि. बीड. यांनी प्रकल्पाविषयी लेखी स्वरूपात अर्ज सादर केलेला आहे अर्जामध्ये खालील मूद्यांचा समावेश करण्यात आलेला आहे-<br>१. वर्तमानपत्रातील नोटीसमध्ये नमुद केलेल्या मे. मोहटा देवी शूगर मिल्स लिमिटेड, मातोरी या कारखान्यास दिं. १४/०९/२००६ रोजी परवानगी दिल्याचे दिसून येत आहे. याचाच अर्थ १७ वर्षापूर्वी यास मंजूरी दिल्याचे दिसून येते.<br>२. मौजे माळेगांव (चकला) येथून सुमन सहकारी कारखाना हा १२ कि.मी. अंतरावर आहे व मोहटा देवी शूगर मिल्सा प्रा.लि. मातोरी ही शूगर मिल्स दोन कि.मी. अंतरावर आहे. या दोन कारखान्यामध्ये जेमतेम १४ कि.मी. अंतर आहे. व नियमानूसार दोन साखर कारखान्या मधील अंतर हे २५ कि.मी. पेक्षा कमी असू नये. दोन्ही साखर कारखाने झाल्यास होणारे प्रदूषण असहय होणार असल्याचे व त्याचा परिणाम मानवी जिवनावर, शेती, पशुधन चारा यांचा —हास करणारे असल्याने हे अंतर आपल्या स्तरावर तपासून पहावे व याची खातर जमा | श्री. सो. म. कुरमूडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत नोंद घेण्यात आलेली असल्याचे सांगितले तसेच प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना याबाबत स्पष्टीकरण सादर करण्याचे सूचविले. |

| | | |
|---|---|---|
| | करावी.<br>३. मे. मोहटा देवी शूगर मिल्स लि. मातोरी यास प्रात्प झालेला IEM मधील नियमानूसार मे. मोहटा देवी शूगर मिल्स लि. कारखान्याच्या प्रवर्तकांनी बँक गॅरंटीची पूर्तता केलेला आहे का.<br>४. Sugar Cane (Control) order- 1966 च्या कलम ६ च्या तरतूदीनूसार कारखान्याचे हवाई अंतर हे नियमात बसते का व बसत नसेल तर असा परवाना देणे नियबाहय होईल व दोन्ही साखर कारखान्याच्या प्रदूषणाने मानवी जीवनावर, शेती व पशूधन यासह पर्यावरणाची मोठी हानी होईल व प्रदूषण कायद्याने हे गैर असेल. | |

श्री. दिलीप खेडकर, यांनी उपस्थितांना बोलताना सांगितले की, नागरिकांनी उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप याची येथे नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच संपतीपत्र अदा करताना जास्तीत जास्त नियम व अटी घालून प्रदूषण कमी करण्याचा म.प्र.नि. मंडळचा प्रयत्न असेल. तसेच आजूबाजूच्या शेतक-यांना प्रदूषणाचा काही त्रास होणार नाही याची दक्षता/काळजी घेवू अशी म.प्र.नि. मंडळाचा प्रतिनिधी म्हणून त्यांनी खात्री दिली. शेवटी श्री. दिलीप खेडकर यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

| | | |
|---|---|---|
| सो. म. कुरमुडे<br>(समन्वयक)<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, जालना. | दिलीप खेडकर<br>(सदस्य)<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद. | संतोष राऊत<br>(अध्यक्ष)<br>तथा<br>अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी बीड. |